प्रकरण तिसरे

# 'मुखवटा' चे नाट्यरुपांतर

## प्रकरण तिसरे

# 'मुखवटा' चे नाट्यरुपांतर

01. प्रास्ताविक :

02. 'मुखवटा' कादंबरीचे नाट्यरुपांतर :

03. 'मॅडम' चे कथानक :

04. 'मुखवटा' व 'मॅडम' मधील साम्य-भेद :

    ४.१. घटना - प्रसंगातील साम्य-भेद :

    ४.२. व्यक्तिचित्रणातील साम्य-भेद :

    ४.३. कथानकातील बदल :

    ४.४. वातावरणनिर्मितीत झालेला बदल :

    ४.५. भाषाशैलीतील साम्य-भेद :

05. 'मॅडम' नाटकातील संवाद :

06. कादंबरीचे यश आणि नाटकाचे यश :-

07. समारोप :

* संदर्भ ग्रंथ :

# प्रकरण तिसरे

# 'मुखवटा' चे नाट्यरुपांतर

## 0१. प्रास्ताविक :-

मराठी वाङ्मयामध्ये कथा, कविता, कादंबरी, नाटक, निबंध, लघुनिबंध, असे अनेक वाङ्मयप्रकार आहेत. त्यामधील प्रत्येक वाङ्मयप्रकार हा दुसऱ्या वाङ्मयप्रकारापेक्षा वेगळा आहे. भिन्न आहे. त्यातल्या त्यात नाटक हा वाङ्मयप्रकार इतर सर्व साहित्य प्रकारांपेक्षा अधिकच वेगळा आहे. कारण नाटक हे दृकश्राव्य अशा दुहेरी स्वरूपाचे असल्यामुळे त्याचा परिणाम एकाचवेळी अनेक आस्वादकांवर होत असतो. या वैशिष्ट्यांमुळे हा वाङ्मयप्रकार इतर वाङ्मयप्रकारांपेक्षा वेगळा ठरतो.

लोकजागृतीचे, प्रबोधनाचे एक साधन या दृष्टीने कथा, कविता, कादंबरी, निबंध इत्यादी साहित्य प्रकारांपेक्षा नाटक हा प्रकार अधिक सामर्थ्यशाली वाटतो. सत्याचा अभास निर्माण करणे हे नाटकाचे उद्दिष्ट असते. त्याचबरोबर समूहमन अधिक परिणामकारकपणे प्रकट करण्यासाठी रंगभूमी अधिक प्रभावशाली ठरते.

नाटक या वाङ्मयप्रकारात अनेक लेखकांनी आपली लेखणी आजमावली. काही नाटककारांनी संस्कृत व इंग्रजी भाषेमधील नाटकांची भाषांतरे केली व त्यांचे प्रयोग सादर केले. तर काहींनी आपल्या प्रतिभा सामर्थ्याने पूर्णपणे स्वतंत्र नाटके रचली. त्याचबरोबर अलिकडच्या कालखंडात काही गाजलेल्या कादंबऱ्यांवर आधारितही काही नाटके लिहिण्यात आली व ती प्रयोगरूपाने सादरही केली गेली. अशाच नाटकांमध्ये श्रीनिवास भणगे यांच्या 'मॅडम' या नाट्यरूपांतराचा समावेश होतो.

## 0२. 'मुखवटा' कादंबरीचे नाट्यरूपांतर :-

प्रा. टी. के. जाधव यांच्या 'मुखवटा' या कादंबरीचे 'मॅडम' हे नाट्यरूप असून हे नाट्यरूप श्रीनिवास भणगे यांनी केले आहे. या नाट्यरूपांतराद्वारे कादंबरीतील आशय अधिक मोठ्या प्रमाणात प्रेक्षकांपर्यंत जाऊन पोहोचला. म्हणूनच 'मुखवटा' कादंबरीचा अभ्यास करत असताना तिच्या नाट्यरूपाचाही परिचय करून घेणे गरजेचे ठरते.

'मॅडम' या नाटकाचा पहिला प्रयोग 'नाट्यसुविधा, मुंबई' या संस्थेने दिनांक २८

ऑक्टोबर १९८१ रोजी शिवाजी मंदिर, मुंबई येथे सादर केला. या नाटकाची लिखित अशी संहिता १ मार्च १९८२ ला प्रकाशित करण्यात आली.

'मॅडम' या नाटकाने रंगभूमीवर भरपूर यश संपादन केले. या नाटकाचा अवघ्या चौंसष्टाव्या दिवशी शंभरावा प्रयोग रंगमंचावर सादर करण्यात आला. या नाटकाचे जवळपास नऊशे प्रयोग सादर करण्यात आले. यावरून या नाटकाच्या लोकप्रियतेचा आणि यशस्वितेचा अंदाज बांधता येतो. अशा या लोकप्रिय नाटकाचे कथाबीज पुढीलप्रमाणे -

**०३. 'मॅडम' चे कथानक :-**

'मॅडम' हे नाटक तीन अंकी असून ते एकूण सात प्रवेशात विभागले आहे. या नाटकाच्या पहिल्या अंकातील पहिल्या प्रवेशात राजापूर या गावचे सरपंच धांडे पाटील व कुलकर्णी मास्तर नलिनीकडे म्हणजेच मॅडमकडे आपल्या गावासाठीच्या 'हातमाग सोसायटी' च्या मंजूरीचे काम घेऊन येतात. या संदर्भात मॅडमबरोबर त्यांची चर्चा होते व शेवटी मॅडम या कामासाठी दहा हजार रूपये लागतील असे सांगते. ती रक्कम देण्याचे सरपंच मान्य करून निघून जातात. या कथाभागाबरोबरच दिनेशच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन, डी.एस.पी. अभयसिंह काळे याच्याशी असणारे मॅडमचे अनैतिक असे संबंध इथपर्यंतचा कथाभाग आलेला आहे.

दुसऱ्या प्रवेशाची सुरूवात नलिनीचा सेक्रेटरी अशोक प्रधानच्या फोनवरील संवादाने होते. या प्रवेशात मनोहर जोशी हे पात्र नव्याने भेटते. हा अत्यंत हुशार असूनही सुशिक्षित बेकार आहे. त्याची कौटुंबिक परिस्थिती हालाखीची आहे.तो दिनेशच्या सांगण्यावरून नोकरी संदर्भात मॅडमला भेटतो. तो आपली सगळी परिस्थिती मॅडमला सांगतो. त्यावर नलिनी दिनेशला शंभर रूपये आणि नोकरीचे खोटे आश्वासन देऊन पाठवून देते.

मनोहर गेल्यानंतर मॅडमच्या घरी आमदार मोहिते यांची भाची मोहिनी येते. ती नलिनीकडे 'जिल्हा खरेदी-विक्री संघा'क च्या सेक्रेटरी पदावर आपली नेमणूक व्हावी म्हणून आलेली असते. कारण नलिनी त्या संघाची अध्यक्ष असते. मग मॅडम आपल्या अध्यक्षपदाचा फायदा घेऊन मोहिनीला ती नोकरी मिळवून देते.

या दोन्ही प्रसंगातून नाटककाराने नोकरीसाठी गुणवत्ता आवश्यक नसून त्यासाठी वशिल्याची, ओळखीची गरज आहे या वास्तवावर प्रकाश टाकला आहे. या प्रवेशाच्या शेवटी मॅडम दिनेशवर आपले प्रेम असल्याचे सांगते आणि प्रवेश दुसरा संपतो.

दुसऱ्या अंकातील पहिल्या प्रवेशात रेडिओवर नलिनीचे 'दारूबंदी' या विषयावरचे भाषण चालू आहे व ते भाषण ती आणि अशोक दारू पीत ऐकत असतात. भाषण संपल्यावर अशोक आपल्या घराकडे निघून जातो. तेवढ्यात मॅडमच्या बंगल्यावर अभयसिंह काळेंचे आगमन होते. त्याला मॅडम टाळण्याचा प्रयत्न करते. पण तो जात नाही तेव्हा मॅडम त्याला, आता माझा 'तुझ्यातला इंटरेस्ट संपला' असे बजावते. आणि सारे नातेसंबंध तोडते. यानंतर अभयसिंह दिनेशला बघून घेईन अशी धमकी देऊन निघून जातो.

अभयसिंह बंगल्यातून जात असतानाच दिनेशचा बंगल्यात प्रवेश होतो. बंगल्यात आल्यावर दिनेश नलिनीला अभयसिंह रागाने का गेले ते विचारतो. यावर मॅडम दिनेशला खोटं कारण सांगून त्याची समजूत काढते. त्याला समजावल्यावर दोघेही एकमेकांच्या आधाराने बेडरूमचा जिना चढू लागतात.

याच अंकातील दुसऱ्या प्रवेशात सरपंच व कुलकर्णी मास्तर त्यांच्या 'हातमाग सोसायटी' चे काम कुठपर्यंत आले आहे याची चौकशी करण्यासाठी मॅडमच्या घरी येतात. त्यावेळी त्यांना मॅडम पंधरा दिवसांच्या दौऱ्यावर गेल्याचे समजताच सरपंच वैतागतात आणि अशोकला ''आता म्होरल्या टायमाला आमी इथं येऊ, तवा आमच्या सोसायटीचा परवाना अन् समदे कागद-उतारे आमच्या हातात पायजे. न्हाईतर रोख दहा हजार रूपये पायजेत''[१] असे बजावून निघून जातात.

यानंतर लगेच तेथे आपल्या नोकरीचे काय झाले याची विचारपूस करण्यासाठी मनोहर जोशी येतो. त्याला जेव्हा अशोक विचारतो की, 'दामले फौंड्रीतून तुम्हांला काही पत्र-बित्रं आलं नाही ?' तेव्हा दिनेश खूपच नाराज होतो आणि स्वतःच्या नशिबाला दोष देतो. अशोक त्याला स्वतःसाठी आणलेली चहा-बिस्किटे देतो. ती मनोहर अधाशासारखी खाऊ लागतो. इथेच अंक संपतो.

वार्ताहार सुभाषच्या आगमनाने तिसऱ्या प्रवेशाची सुरूवात होते. नलिनी आणि सुभाष यांच्यात नलिनीच्या दौऱ्याबद्दल चर्चा चालू असते त्याचवेळी तेथे मोहिनी आणि तिचा प्रियकर अरूण शिंदे येतात. मोहिनी आपल्याला प्रमोशन मिळाल्याचे सांगून नलिनीला व सुभाषला पेढे देते. तसेच अरूणची ओळख करून देऊन त्याचे बँक प्रकरणाचे काम करण्यास सांगते. त्याचवेळी वार्ताहार निघून जातो.

मॅडम, मोहिनी व अरूण यांच्यात संवाद चालू असतानाच अतिशय विमनस्क अशा

अवस्थेत दिनेशचा प्रवेश होतो. त्याची ती अवस्था पाहून मोहिनी व अरूण तेथून काढता पाय घेतात. त्यावेळेस दिनेश मनोहरने आत्महत्या केल्याचे मॅडमला सांगतो. मनोहरच्या आत्महत्येने दिनेशच्या मनावर खोल असा परिणाम होतो. तो अत्यंत दु:खी होतो. या अवस्थेत तो मॅडमला बरेच काहीबाही बोलतो आणि तिच्याच कुशीत शिरून धाय मोकलून रडू लागतो. इथपर्यंतचा कथाभाग दुसऱ्या अंकात येतो.

तिसऱ्या अंकातील पहिल्या प्रवेशात दिनेशच्या काव्यसंग्रहास बक्षीस मिळते. त्याने तो खूप आनंदी होतो. पण त्याला ते बक्षीस मॅडमच्या शिफारसीमुळे मिळाल्याचे रहिमचाचा सांगतो. याच अंकात राजापूरचे सरपंच आपले पैसे मागण्यासाठी गावातील लोक घेऊन येतात. त्यांना पैसे देण्यास मॅडम नकार देते तेव्हा दिनेश आपल्याला मिळालेल्या बक्षिसाचा चेक कुलकर्णी मास्तरांच्या हवाली करतो. हा प्रकार पाहून सर्वचजण भारावून जातात. बंगल्यातून सर्वजण निघून गेल्यावर मॅडम दिनेशला किस करावयास सांगते. पण 'मुखवट्यांची चुंबनं घ्यायला मी तितका शेणामेणाचा झालो नाही अजून !!' असे सांगून किस करण्यास नकार देतो. इथेच प्रवेश संपतो. या प्रवेशात मॅडमचे व्यभिचारी, भ्रष्टाचारी, व्यसनी रूप नजरेस पडते.

यानंतरच्या दुसऱ्या व शेवटच्या प्रवेशात मॅडमच्या अशा वागण्याला कंटाळून तिची आई तिच्याशी असणारे संबंध तोडून टाकते. अशोकही नलिनीच्या या वागण्याला कंटाळून सेक्रेटरीची नोकरी सोडून निघून जातो. यापाठोपाठ मोहिनी आणि नलिनीमध्ये अरूण व नलिनीच्या संबंधावरून भांडण-तंटा होतो. आणि 'मला हे सगळं कळलंय आणि त्याच्यावर मी योग्य ती उपाययोजना करणार आहे' असे मोहिनी मॅडमला बजावून निघून जाते. पाठोपाठ अरूणही निघून जातो.

थोड्यावेळाने तेथे दिनेश येतो. तो आपल्याला नोकरीवरून कमी केल्याचे मॅडमला सांगतो. त्याचबरोबर नलिनीने हे सर्व पद, प्रतिष्ठा, पैसा सोडून आपल्याबरोबर येण्यासाठी विनवितो पण त्याच्याबरोबर जाण्यास ती नकार देते. उलट ती त्याला म्हणते, ''माझ्या डोळ्यांसमोर आता एकच स्वप्न आहे. स्वप्न नव्हे ध्यास !... आमदारकी, खासदारकी... निरनिराळी पदे,मोटारगाड्या, बंगले, प्रसिध्दी, हार - तुरे, व्याख्यानं आणि प्रचंड झगमगाट घेऊन येणारं ग्लॅमर ! आणि या ओघात वापरण्यात येणारे देखणे, बुध्दिमान पुरूष ! बस ! यापलिकडे काहिही खरं नाही... प्रेमबीम झुठ है...''[२] असे म्हणून ती त्याच्यापुढे आपलं

सगळं पूर्वायुष्य मांडते.

नलिनी पाटणकरचे वयाच्या सोळाव्या वर्षी एका कारकूनाशी लग्न होते. परंतु हुंड्याची ठरलेली रक्कम त्याला मिळाली नाही म्हणून तो नलिनीशी विवाहानंतरही वैवाहिक संबंध ठेवत नाही. रोज रात्री तो तिची कामवासना जागृत करून तिचे शमन न करता ढसाढसा दारू ढोसून तसाच झोपी जायचा. अशा प्रकारे तो तिचा छळ करी.

या कामवासनेच्या अतृप्तीतूनच एक दिवस ती घर सोडते. रहिमचाचा हा अंडी विकणारा तिला आसरा देतो. शहरात जाऊन ती शिक्षण घेते. वाटेल त्या मार्गाने यश, पद, प्रतिष्ठा, प्रसिद्धी मिळविते. त्यासाठी आपल्या स्त्रीत्वाचा वापरही करते. आपल्या संपर्कात येणाऱ्या सर्व पुरूषांशी अनैतिक संबंध ठेवून आपली वासनातृप्ती करून घेते. प्रत्येकाशी प्रेमाचं खोटं नाटक करून प्रत्येकाला फसवते.

मॅडमच्या पायाशी प्रत्येक सुख लोळण घेत असताना तिचा पती तिच्याकडे आश्रयाला येतो. तिही त्याला आश्रय देते. पण त्याच्यावर सूड उगवण्यासाठी, बदला घेण्यासाठी. नलिनी आपल्या नवऱ्यादेखत परपुरूषाच्या मिठीत विसावते. त्यांच्याशी त्याच्या डोळ्यादेखत शृंगारिक चाळे करते. अशा प्रकारे लग्नानंतर झालेल्या छळाचा बदला ती घेते. ह्या सगळ्यातून पूर्वायुष्यात सोज्वळ अशी असणारी नलिनी पुढे राजकारणी व महत्वाकांक्षी होते. मग ती व्यसनी, भ्रष्टाचारी, व्यभिचारी बनते. आणि आता ती इच्छा असूनही यातून बाहेर पडू शकत नाही. कारण तिचे हे वागणे आता तिचे व्यसनच बनले आहे. त्याशिवाय ती राहूच शकत नाही. तिचे हे सर्व ऐकून दिनेश तिला सोडून निघून जातो. दिनेश गेल्यावर मॅडम अरूण शिंदेला फोन करून घरी बोलावून घेते. आणि इथेच नाटकाचा शेवट होतो.

अशा प्रकारे श्रीनिवास भणगे यांनी एक सोज्वळ अशी तरुणी कशाप्रकारे सूडाने पेटून उठते आणि कशा प्रकारे व्यसनी बनते, भ्रष्टाचार करु लागते, व्यभिचार करते आणि हे वागणे तिचे व्यसन बनते. हे या नाट्यरुपांतराद्वारे रंगमंचावर सादर केले आहे. कादंबरीतील विषयच येथे नाटकातून मांडण्यात आला आहे. असे नाट्यरुप देताना साहित्य प्रकारानुसार लेखकास काही गोष्टी तशाच ठेऊन काहीत बदल करावे लागतात. त्यामुळेच दोन्ही साहित्यकृतीतून काही साम्य-भेद निर्माण होतात. इथे 'मॅडम व मुखवटा' मधील साम्यभेदांचे स्वरुप थोडक्यात पहावयाचे आहे.

## ०४. 'मुखवटा' व 'मॅडम' मधील साम्य-भेद :-

'मुखवटा' या कादंबरीचे 'मॅडम' मध्ये नाट्यरुपांतर करत असताना श्रीनिवास भणगे यांनी काही बदल केले आहेत. कादंबरी व नाटक हे वाङ्मयप्रकार भिन्न भिन्न असल्याकारणाने बदल करणे आवश्यक होते. मात्र दोन्ही कलाकृतींतून एकच विषय मांडण्यात आला आहे. विषयात फारसा बदल केलेला नाही. जो काही बदल करण्यात आला आहे. तो पात्रांची संख्या, पात्रांची नावे, काही घटना-प्रसंग, वातावरणनिर्मिती, संवाद इत्यादींमध्ये केलेला आहे.

मात्र या बदलांचे स्वरुप अल्प असे आहे. दोन्ही साहित्यकृतींतून एकच एक विषय हाताळण्यात आला असल्यामुळे दोन्ही साहित्यकृतीतून साम्यच मोठ्या प्रमाणात आढळते. काही घटनाप्रसंग, पात्रे, तशीच्या तशी नाटकात अवतरतात. असे साम्य-भेद पुढीलप्रमाणे :-

### ०४.१ घटना - प्रसंगातील साम्य-भेद :

'मुखवटा' या कादंबरीवर आधारित 'मॅडम' या नाट्यरुपांतराचा विचार करताना नाट्यरुपातील व कादंबरीतील काही घटना प्रसंगात लक्षणीय असे भेद जाणवतात. राजापूरच्या लोकांनी 'हातमाग योजने'च्या मंजुरीसाठी नलिनीची मदत मागण्याच्या संदर्भातील प्रसंगात प्रकर्षाने भेद केल्याचे दिसते.

हा प्रसंग कादंबरीत असा येतो- कादंबरीत सुरुवातील एका सभेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी तयार करण्यात आलेला स्टेज, तेथे जमलेले लोक, त्यांच्यातील उत्साहाचे वातावरण आसपासचे वातावरण, कार्यकर्तांच्या हालचाली या सर्वांचे सविस्तर वर्णन येते. थोड्याच वेळात नलिनीचे तेथे आगमन होते. नंतर कुलकर्णी मास्तर आपल्या भाषणातून नलिनीचा व तिच्या कार्यकर्तृत्वाचा परिचय करुन देतात. त्यानंतर सरपंच व शेख वकील यांचे भाषण झाल्यावर स्टेजवर नलिनीला भाषणासाठी आमंत्रित केले जाते.

नलिनीच्या धीरगंभीर आवाजात भाषणाला सुरुवात होताच टाळ्यांचा कडकडाट होतो. ती भाषणात 'हातमाग योजने' च्या कामात तन-मन-धनाने प्रयत्न करण्याचे आश्वासन देते आणि वरती सरपंच, मास्तर व वकील ही 'त्रिमुर्ती' जर आपल्या दारात या कामासंदर्भात काही मदत मागण्यासाठी आली तर नाही म्हणू नका असे सांगते. आणि भाषण संपवते.

हाच प्रसंग कादंबरीप्रमाणेच नाटकातही सुरुवातीलाच येतो. पण नाटकात काही प्रसंग

रंगमंचावर सादर करण्यास मर्यादा येत असल्यामुळे या प्रसंगातील सभा, सभेचे वर्णन आणि भाषण हा भाग वगळला आहे. त्याऐवजी नाटकाच्या सुरुवातीलाच नलिनीच्या बंगल्यावर सरपंच धांडे-पाटील आणि कुलकर्णी मास्तर मॅडमची वाट पाहत आहेत. धांडे पाटील नलिनीची वाट पाहून कंटाळतात. म्हणून ते सारख्या येरझाऱ्या घालत असतात, सारखे गेटपर्यंत जाऊन गाडी आली का ते पाहतात.

मग थोड्या कालावधिनंतर मॅडम व दिनेश येतात. ती सर्वांना पुढारी थाटात नमस्कार करुन चहापाण्याचे विचारते. आणि मग 'हातमाग योजने'च्या विषयावर चर्चा करते. ती त्यांना त्या कामासाठी दहा हजार रुपये लागतील असे सांगते. ती रक्कम देण्याचे मान्य करुन सरपंच आणि मास्तर निघून जातात. असा भेद केल्याचे नजरेस पडते.

कादंबरीत दिनेशच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन हे त्याला प्राध्यापकाची नोकरी लागण्या अगोदर झालेले आढळते. नाटकात त्याला नोकरी लागल्यानंतर काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाल्याचा उल्लेख येतो. नलिनीने दिनेशच्या काही प्रकाशकांशी ओळख करुन दिल्याचा उल्लेख कादंबरीत आला आहे. मात्र नाटकात हा उल्लेख येत नाही. नाटकातील मनोहर जोशी हा बी.कॉम.अकौंटन्सी या विषयातून ऑनर्स मध्ये पास झाला आहे. तर कादंबरीतील मनोहर हा इंग्रजी मधून एम.ए. झाला असून तो 'गोल्ड मेडलिस्ट' आहे.

कादंबरीत मनोहर अनेकांकडे त्याला नोकरी मिळावी म्हणून जातो. त्यांच्यासमोर आपली सर्व परिस्थिती मांडतो, त्यांची मुले सांभाळणे, भाजीपाला आणणे, कपडे इस्त्री करणे अशी सर्व कामे करतो. पण त्याला कोणीही नोकरी देत नाही. मग शेवटचा पर्याय म्हणून तो नलिनीकडे येतो. ती त्याला 'तुम्ही तर मला माझ्या भावासारखे आहात. मी तुमच्यासाठी जरुर काही तरी करीन' असे खोटे आश्वासन देऊन पाठविते. तेथेच दिनेशची व मनोहरची ओळख होते.

मात्र नाटकात मॅडमकडे येण्याअगोदरपासूनच दिनेशची व मनोहरची ओळख असते. एवढेच नव्हे तर दिनेशच्या सांगण्यावरुनच त्याची चिठ्ठी घेऊन मनोहर नोकरीच्या कामासाठी मॅडमकडे येतो. मॅडमशी चर्चा झाल्यावर मॅडम त्याचा बायोडाटा ठेऊन घेते व जाताना मनोहरच्या हातावर शंभर रुपये ठेवते. असा प्रसंग आला आहे. शिवाय कादंबरीत मनोहरची व नलिनीची दोन वेळा भेट होते (पृष्ठ क्र.५५,७४). नाटकात मात्र फक्त एकदाच होते (पृष्ठ क्र.२१).

दुसऱ्या वेळेस मनोहर मॅडमच्या घरी येतो तेव्हा मॅडम घरी नसतात. तो अशोकला भेटूनच परत जातो. (पृष्ठ क्र.४३, ४४).

या बदलांव्यतिरिक्त आणखीही काही भेद जाणवतात. उदा. कादंबरीत दिनेशच्या काव्यसंग्राहास पुरस्कार मिळतो तो त्यातील काव्यगुणांमुळे. मात्र नाटकात पुरस्कार मिळतो तो मॅडमच्या शिफारशीमुळे. कादंबरीतील पुरस्काराची रक्कम आहे एक लाख रुपये तर नाटकातील पुरस्कार आहे दहा हजार रुपयांचा. कादंबरीतील दिनेश नलिनीचे खरे रुप समजल्यावर तिने दिलेली नोकरी स्वतःहून सोडतो. तर नाटकात डी.एस.पी. अभयसिंह काळे दिनेशच्या प्राचार्यांशी संगनमत करुन त्याला नोकरीवरुन काढून टाकतो.

'मुखवटा' मधील नलिनी ही अविवाहित असून ती समीरने केलेल्या प्रेमभंगाचा बदला आपल्या सहवासात येणाऱ्या प्रत्येक पुरुषाशी शरीर संबंध ठेऊन घेत असते. तर 'मॅडम' मधील नलिनी उर्फ मॅडम ही विवाहित आहे. तिचा वयाच्या सोळाव्या वर्षी एका कारकूनाशी विवाह झालेला आहे. हुंड्याची सगळी रक्कम मिळाली नाही म्हणून छळ करणाऱ्या पतीवर ती सूड उगवत असते.

नलिनीने हातमाग योजनेसाठी घेतलेली रक्कम परत मागण्यासाठी कादंबरीत सरपंच, वकील, मास्तर आणि आणखी एक इसम असे चौघेजण येतात. ज्यावेळी नलिनी पैसे परत करण्यास नकार देते तेव्हा कुलकर्णी मास्तरांना भोवळ येऊन ते जमिनीवर कोसळतात. त्यांना वारा घालत असताना सरपंच धांडे पाटील नलिनीशी भांडत असतात. या सर्वांना न जुमानता, त्यांचा कसलाही विचार न करता नलिनी आपल्या बेडरुममध्ये जाते व झोपेच्या गोळ्या घेऊन झोपी जाते.

यानंतर दिनेश आपल्याला मिळालेल्या पुरस्काराची रक्कम राजापूरवासियांना देतो. हे सर्व नलिनीला सकाळी दिनेश स्वतः सांगतो त्यावेळेस समजते. मात्र नाटकात पैसे मागण्यासाठी केवळ सरपंच मास्तर न येता त्यांच्याबरोबर गावातील पाच पन्नास लोक असतात. या सर्वांना घेऊन सरपंच नलिनीच्या बंगल्यावर येतात. मात्र त्यांच्याबरोबर वकील व तो इसम नसतो.

राजापूरवासियांना पैसे देण्यास मॅडम नकार देते तेव्हा सरपंच 'बाई, आपल्याला धांडे पाटील म्हनत्यात, उभा जळलो तरी बेहतर पण तुम्हास्नी घेऊन जळन !' असा दम भरतात.

त्यावेळी दिनेश मध्यस्ती करुन अशोकला मॅडमला घेऊन बेडरुममध्ये जाण्यास सांगतो. मॅडम गेल्यानंतर तो गुरुजींना त्यांचे पैसे आठ दिवसांनी देतो म्हणून सांगतो. परंतु ते सरपंचांना पटत नाही. तेंव्हा तो बक्षिसाचा चेक तसाच गुरुजींच्या हवाली करतो.

हे सर्व मॅडम व अशोक जिन्याजवळ उभे राहून पाहतात. हे दृश्य पाहून दोघेही भारावून जातात. थोड्यावेळाने बंगल्यातून सरपंच, मास्तर, अशोक निघून गेल्यावर नलिनी त्याला वर बोलावून ''दिनेश, दिनेश यू आर ग्रेट ! अरे, माझ्यासारख्या सगळं काही पचवून पलिकडे गेलेल्या बाईला आज तू सलाम करायला लावलास ! सॅल्यूट टू यू दिनेश... अँड ... अँड आय लव्ह यू दिनेश !''[३] असे म्हणते.

अशाप्रकारे श्रीनिवास भणगे यांनी घटना-प्रसंगात आवश्यक असे भेद, बदल करुन कादंबरीतील आशय नाटकातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या भेदांबरोबरच काही साम्येही दोन्ही कलाकृतीत आढळतात.

हातमाग योजनेच्या मंजूरीसाठी राजापूरच्या लोकांनी नलिनीकडे मदत मागणे, त्यासाठी लागणारा पैसा जमा करुन नलिनीकडे सुपुर्द करणे, कालांतराने नलिनीने ती रक्कम स्वत:करता वापरणे, ती रक्कम हातमाग योजनेसाठी खर्च झाल्याचे सांगून ती रक्कम परत करण्यास नकार देणे, दिनेशच्या काव्यसंग्रहास बक्षीस मिळणे, बक्षिसाची रक्कम राजापूरच्या लोकांना देणे, त्याने प्राध्यापकाची नोकरी करणे इत्यादी.

तसेच मनोहर जोशी या तरुणाने नोकरीसाठी मॅडमकडे येणे, घरच्या गरिबीला कंटाळून त्याच्या वडिलांनी व त्याने आत्महत्या करणे, अभयसिंह काळेशी मॅडमचे अनैतिक संबंध असणे, वार्ताहरास पैसे देऊन वर्तमानपत्रातून आपले फोटो व बातम्या छापून आणणे, 'दारुबंदी' या विषयावर व्याख्यान देणाऱ्या नलिनीने स्वत:च दारु पिणे इत्यादी अनेक प्रसंगातून साम्य नजरेस पडते.

या साम्य-भेदांबरोबरच नाटककराने काही प्रसंग नव्याने योजिले आहेत. उदा. मनोहर जोशी दुसऱ्यांदा मॅडमच्या घरी आपल्या नोकरीचे काय झाले ते विचारण्यास येतो तो प्रसंग, मॅडम आणि दिनेशने मिळून पंधरा दिवसांच्या दौऱ्यावर जाण्याचा प्रसंग, मॅडम व दिनेश दौऱ्यावर गेल्यावर नलिनीच्या घरी सरपंच व मास्तर येण्याचा प्रसंग तसेच मोहिनी व अरुण शिंदे यांच्याशी संबंधित असणारे सर्वच प्रसंग इत्यादी प्रसंगाची निर्मिती नाटकात नव्याने करण्यात

आली आहे. हे प्रसंग कादंबरीत आढळत नाहीत.

नाट्यरुपांतर करताना जरी श्रीनिवास भणगेनी काही नव्या प्रसंगांची भर घातली असली तरी मुळात कांदबरीत असणाऱ्या अनेक प्रसंगांची काट-छाटही केलेली आहे. कादंबरीतील अनेक प्रसंगांचा समावेश नाटकात केलेला नाही. त्यातील कमी केलेले प्रसंग खालीलप्रमाणे

नलिनी आणि दिनेश दोघे मिळून नलिनीच्या आईला भेटण्यासाठी जातात त्यावेळी तेथे डॉ. युवराज पाटणकर हा नलिनीचा भाऊ आलेला असतो. त्यांच्यात सुरुवातील प्राथमिक स्वरुपाच्या गप्पा होतात. त्यानंतर डॉ. पाटकर नलिनीला ''आता तरी मागे फिर. परतीची वाट धर. झालं गेलं सर्व विसरुन जा. समीरलाही विसरुन जा. तुही समीरचाच कित्ता गिरव. तो लग्न करुन आपल्या मुलांबाळांत सुखी झाला आहे. तसं तुही लग्न करुन घे, हवं तर मी तुझं लग्न करुन देतो. तुही एक छोटसं घरकुल बनवं. मुलं-बाळं, पती यांच्यास्मवेत आनंदात रहा !''[४] असा सल्ला देतात. पण त्यावर नलिनी लग्नास नकार देते आणि जर घरच्यांनी आग्रह केला तर 'मी आत्महत्या करीन' असे सांगते. हा प्रसंग नाटकात आलेला नाही.

दिनेशच्या कॉलेजचा विद्यार्थी अलकुंठे यास कमी उपस्थिती भरल्यामुळे परीक्षेला बसता येणार नसते. म्हणून तो प्रायव्हेट गाडी करुन नलिनीला विद्यापीठात घेऊन जातो. मात्र तेथे गेल्यावर नलिनी स्वतःच्या पी.एचडी. चे व सौ. वासंती कुलकर्णीच्या पदाचे काम करते. ती अलकुंठेला फसवते. हा प्रसंग नाटकात वगळण्यात आला आहे.

तसेच प्रा. सौ. वासंती कुलकर्णी व नलिनी दोघी मिळून विद्यापीठाकडून मिळालेल्या बहिःशाल कार्यक्रमाच्या रक्कमेत खोटे हिशोब व पावत्या दाखवून अफरातफर करतात. सुधा तारे या विद्यार्थीनीची मानसिकता व्यक्त करणारा प्रसंग, गोळ्या-बिस्कीटे विकून पोट भरणाऱ्या नलिनीच्या भाडेकरुचा व नलिनीच्या दारात आलेल्या भिकाऱ्याचा प्रसंग नाट्यरुपांतरात आढळत नाही. नलिनीचे भ्रष्ट, व्यसनी, व्यभिचारी रुप दाखवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या प्रसंगांचीच निवड नाटककाराने केली आहे. अनावश्यक प्रसंगांना बगल दिली आहे.

अशा प्रकारची काही साम्ये, काही भेद नाट्यरुपात आहेत. तर काही प्रसंग नव्याने येतात. कमीत कमी प्रसंगातून नलिनीचा खरा चेहरा, खरे रुप दाखविण्याचा प्रयत्न श्रीनिवास भणगेंनी केला आहे.

### ०४.२ व्यक्तिचित्रणातील साम्यभेद :

प्रा. टी. के. जाधव यांच्या 'मुखवटा' या कादंबरीचे 'मॅडम' या नाटकामध्ये रुपांतर करताना श्रीनिवास भणगे यांनी ज्याप्रमाणे घटनाप्रसंगात बदल केला आहे. त्याचप्रमाणे व्यक्तिचित्रणातही बदल केलेला आहे. मात्र हा बदल फार मोठा नाही. कारण कादंबरीतील व नाटकातील पात्रे आहेत तिच आहेत. पात्रांच्या नावात देखील बदल केलेला नाही. फक्त एखादं-दुसरं पात्र कमी करुन एखाद्या नवीन पात्राची योजना केली आहे. तसेच पात्रांच्या स्वभावात, वागण्यातही अल्पसा बदल जाणवतो.

**१) नलिनी पाटणकर :**

कादंबरी व नाटक दोन्हींच्या मध्यवर्ती नलिनी पाटणकर हीच व्यक्तिरेखा असून दोन्ही कलाकृतींचे कथानक या व्यक्तिरेखेभोवती गुंफण्यात आले आहे. दोन्ही कलाकृतीतील नलिनी ही आपल्यावर पूर्वायुष्यात झालेल्या अन्यायाचा सूड वेगळ्याप्रकारे उगवताना दिसते. अशा नलिनीचे पात्र कादंबरीत प्रा. जाधव यांनी अनेक घटना-प्रसंगातून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

कादंबरीत व्यक्तिरेखाटनाला अधिक वाव असतो. तर निवडक घटना प्रसंगाच्या सहाय्याने व्यक्तिचित्रण करण्याचे बंधन नाटककारावर असते. 'मॅडम' या नाट्यरुपांतरात श्रीनिवास भणगे यांनी कादंबरीतील काही निवडक घटना प्रसंग घेऊन नलिनीचे व्यक्तिचित्रण केलेले आहे. अनेक प्रसंगांची निर्मिती करुन मॅडमचा व्यभिचार, भ्रष्टाचार, व्यसनीवृत्ती, तिच्या वागण्यातील विरोधाभास दाखवून दिला आहे.

कादंबरीतून चित्रित झालेली नलिनी अधिकच व्यभिचारी वाटते. कारण लेखकाने नलिनीचे अनेक पुरुषांशी संबंध असल्याचे दाखविले आहे. उदा. नलिनी ही अभयसिंह काळे, इन्स्पेक्टर गव्हाणे, इन्स्पेक्टर मोरे, इंजिनियर सानप, प्रा. पवार, कदम, शितोळे, चंद्रकांत साळवी अशा अनेकांशी शरीर संबंध ठेवते. तसेच विद्यापीठाच्या बहि:शाल कार्यक्रमाची रक्कम स्वत:साठी वापरते.

अलकुंठे या विद्यार्थ्यास त्याचे काम करण्यासाठी विद्यापीठात घेऊन जाते आणि स्वत:चे काम करुन येते. दारुबंदीवर व्याख्यान देते आणि स्वत:च दारु पिते. 'भूतदया' हा विषय व्याख्यानासाठी ठरविणारी नलिनी दारात आलेल्या भिकाऱ्याला भीक न देता हाकलून देण्यास

सांगते. अशा इतरही काही प्रसंगातून लेखकाने नलिनीच्या वागण्यावर, वृत्तीवर प्रकाश टाकला आहे.

नाटकात माध्यमाची निकड म्हणून काही घटनाप्रसंग वगळण्यात आले आहेत. नाटकात फक्त अभयसिंह काळे, अशोक प्रधान, दिनेश व अरुण शिंदे यांच्याशी मॅडमचे शरीर संबंध असल्याचा उल्लेख येतो. कादंबरीत नलिनी अनेक प्रसंगी दारु पिताना आढळते. तर नाटकात फक्त एकदाच अढळते. नाटकात अलकुंठे या विद्यार्थ्यास फसविण्याचा प्रसंग, दिनेशवर असणारे सुधा तारेचे प्रेम ,नलिनीचे इतर पुरुषांशी असणारे संबंध डॉ. युवराज पाटणकर व नलिनी यांच्यातील संवाद झालेला प्रसंग, 'भूतदया' हा विषय व्याख्यानासाठी ठरविणाऱ्या नलिनीने दारात आलेल्या भिकाऱ्यास भीक न देता हाकलून देण्यासंदर्भातील प्रसंग इत्यादी प्रसंगांचा नाट्यरुपांतरात साधा उल्लेखही येत नाही. त्याकारणाने नाटकातून नलिनीची काही गुणवैशिष्ट्ये अंधारात राहतात.

कादंबरीतील नलिनी ही अविवाहित असून तिचा पूर्वी प्रेमभंग झालेला आहे. म्हणून ती अविवाहित राहून पद, प्रतिष्ठा, प्रसिद्धी, पैसा मिळवून परपुरुषांशी संबंध ठेऊन आपला बदला घेताना दिसते. तर नाटकातील नलिनी ही विवाहित असून लग्नानंतर झालेल्या आपल्या छळाचा बदला ती प्रतिष्ठा, प्रसिद्धी, पैसा मिळाल्यावर घेताना आढळते. असा या व्यक्तिचित्रणात फरक करण्यात आला आहे.

नाट्यमर्यादेमुळे ज्याप्रमाणे लेखकाने नलिनीच्या जीवनातील काही महत्त्वपूर्ण घटना -प्रसंगांना नाट्यरुपांतरांत स्थान दिले नाही. तसेच तिच्याशी संबंधीत काही घटना-प्रसंग नव्याने योजिले आहेत. मोहिनीने अरुण शिंदेची नलिनीशी ओळख करुन देणे. अरुणशी नलिनीने शारीरिक संबंध ठेवणे, नलिनीचे लग्न होणे, तिच्या नवऱ्याने तिचा छळ करणे. त्याच छळाचा बदला म्हणून तिने नवऱ्यासमोर परपुरुषाशी शृंगार करणे, अशोक प्रधान या पात्राशी संबंधित प्रसंग इत्यादी काही प्रसंगांची नाटकात नव्याने भर घालण्यात आली आहे.

कादंबरीत येणाऱ्या अनेक घटना-प्रसंगातून नलिनीच्या हरएक स्वभावावर प्रकाश पडतो. तिच्या व्यक्तित्वाचे अनेक पैलू कादंबरीत पहावयास मिळतात. पण या सर्व प्रसंगातून प्रा. जाधव यांना नलिनीच्या रुपाचे जे दर्शन घडवायचे आहे तेच दर्शन अगदी निवडक घटना-प्रसंग निवडून श्रीनिवास भणगेंनी घडविले आहे. कादंबरीतून नलिनीच्या व्यभिचारी, फसवी,

भ्रष्टाचार करणारी अशी स्वभाववैशिष्ट्ये नजरेस पडतात. तिच नाटकातूनही समोर येतात. दोन्हीतूनही एकाच नलिनीचे दर्शन घडते. काही घटना-प्रसंग वगळण्यात आल्यामुळे नाटकातील नलिनीची काही स्वभाववैशिष्ट्ये अंधारात राहतात. पण त्यामुळे तिच्या कादंबरीतील व्यक्तिमत्त्वाचे दर्शन नाटकातून घडण्यास काहीही फरक पडत नाही.

**२) दिनेश साखळकर :**

कादंबरीत अत्यंत महत्त्वपूर्ण असणारी दिनेशची व्यक्तिरेखा नाटकात फारसी प्रभावी वाटत नाही. 'मुखवटा'मध्ये नलिनी या पात्रानंतर दिनेशची व्यक्तिरेखा अनन्यसाधारण ठरते. मात्र नाटकात त्याला दुय्यम स्थान प्राप्त झाले आहे. कारण दिनेशशी संबंधीत अनेक घटना-प्रसंग नाटकात येत नाहीत. परिणामी दिनेशची व्यक्तिरेखा पुसटशी वाटते.

कादंबरीतून आलेल्या अनेक कवितांमधून, त्याच्या बोलण्यातून येणारी काव्यात्मकता या सर्वांतून दिनेशच्या काव्यप्रतिभेचा परिचय होतो. मात्र नाटकात अशी काव्यात्मकता आलेली नसल्याने त्याच्या प्रतिभेवर प्रकाश पडत नाही. कादंबरीत येणाऱ्या स्वगतामधून त्याची मानसिकता, त्याचा स्वभाव कळण्यास मदत होते.

नलिनीने आपल्यासारख्या एका अनाथाला आश्रय दिला, नोकरीला लावले, काव्यसंग्रह प्रकाशित केला, अनेकांशी आपला खास माणूस म्हणून ओळखी करुन दिल्या, वेळोवेळी आपली विचारपूस केली. या नलिनीच्या वागणुकीने तो भारावून जातो आणि नलिनीलाच आपले माता, पिता, बंधू मित्र, सर्व काही मानू लागतो. हा त्याच्या मनातील नलिनीबद्दलचा आदर त्याच्या स्वगतातून व्यक्त होतो. त्याचबरोबर अशा स्वगतातूनच त्याच्या मनाची तगमग निदर्शनास येते आणि त्यातून एक भावनिक, हळव्या मनाचा, सात्विक प्रेम करणारा, माणुसकी जपणारा, इतरांना मदत करणारा, इतरांबद्दल सहानुभूती बाळगणारा दिनेश समोर येतो. मात्र नाटकात हे प्रसंग येत नाहीत. त्यामुळे तेथील दिनेश व त्याची गुणवैशिष्ट्ये उत्कटपणे व्यक्त होत नाही. नाटकात त्याला गौण स्थान प्राप्त होते.

कादंबरीत सतत सावलीसारखा नलिनीबरोबर असणारा दिनेश नाटकात काही ठराविक प्रसंगीच आढळतो. दिनेशची भूमिका नाटकात उभी करण्यास काही मर्यादा पडल्याचे जाणवते. रंगभूमीच्या मार्यादेमुळे त्याचे संपूर्ण रुप उभे राहत नाही. कादंबरीतील दिनेश वाचकांच्या मनावर ठसा उमटवून जातो. मात्र नाटकातून भेटणारा दिनेश हा फक्त एक पाहुणा कलाकार

असल्यासारखा वाटतो.

**३) अशोक प्रधान :**

हे नाटकात येणारे पात्र जे कादंबरीत नाही. अशोक हा नलिनीचा सेक्रेटरी आहे. कादंबरीत ज्याप्रमाणे दिनेश हे पात्र लक्षात राहते. त्याप्रमाणे नाटकात अशोक लक्षात राहतो. मॅडम व अशोकमध्ये अनैतिक संबंध असतात. अशोक मॅडमवर कोणतेही संकट येऊ नये म्हणून काळजी घेतो. वेळप्रसंगी खोटेही बोलतो. त्याची परिस्थिती बिकट असल्याने तो मॅडमची नोकरी करतो. त्याला मॅडमची सर्व रुपे माहित असतात. त्याला मॅडमचे हे गैरवर्तन आवडत नसते. तरीपण तो नाईलाज म्हणून तेथे नोकरी करतो. ईच्छा असूनही त्याला नोकरी सोडता येत नाही.

मॅडमच्या येथील त्याचे जीवन हे लाचारीचे जीवन असते. त्याच्यात व नलिनीच्यात शारीरिक संबंध असले तरी नलिनीच्या परवानगीशिवाय अशोक तिला स्पर्शही करु शकत नाही. एकदा तो असाच मॅडमशी जवळीक साधून तिला मिठी मारतो त्यावेळी मॅडम त्याला बजावते, ''ज्यावेळी मला गरज असेल आणि मी तुला बोलावीन, त्यावेळी धावत येणं हा तुझ्या ड्युटीचा भाग झाला ! त्याशिवाय कोणत्याही क्षणी, आता केलास तसा, आगाऊपणा केलास तर हे काम सोडून नोकरीसाठी गावगन्ना हिंडावं लागेल.''[५]

यातून अशोकची लाचारी व त्याला असणारी नोकरीची आवश्यकता दिसून येते. यानंतर काही दिवसांनी तो मॅडमच्या या स्वैर वागण्याला कंटाळून नोकरी सोडून निघून जातो.

याशिवाय आमदार मोहित्यांची भाची मोहिनी तिचा प्रियकर अरुण शिंदे अशी काही इतरही पात्रे आणि त्यांच्याशी संबंधीत असे घटना-प्रसंग लेखकाने नव्याने नाटकात समाविष्ट केले आहेत.

**४) अन्य व्यक्तिरेखा :**

मुख्य पात्रांना, त्यांच्यातील स्वभाववैशिष्ट्यांना उठावदारपणा प्राप्त करुन देण्यासाठी लेखक इतरही काही गौण पात्रांची निर्मिती करत असतो. या गौणपात्रांच्या सहाय्यानेच मुख्य पात्रे महत्त्वपूर्ण ठरत असतात. त्यांना उठावदारपणा प्राप्त होत असतो. अशी काही गौण पात्रे कादंबरीप्रमाणेच नाटकातही भेटतात.

*** धांडे पाटील :**

कादंबरीप्रमाणेच नाटकातील धांडे पाटील हे पात्र भेटते. हे राजापूरचे सरपंच असून गावाच्या विकासासाठी सतत धडपडत असतात. त्यांचे गावावर प्रेम आहे. ते गावाच्या भल्यासाठी 'हातमाग-योजना' उभी करण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी लागणारी रक्कम स्वत: देण्याचे मान्य करतात. कादंबरीतील धांडे पाटलांप्रमाणेच नाटकातील धांडे पाटील आदर्श सरपंच, प्रामाणिकपणे गावचा कारभार पाहणारे सरपंच आहेत. या व्यक्तिरेखेत फारसा बदल केल्याचे जाणवत नाही. त्यांच्या तोंडीही ग्रामीण भाषा वापरली आहे. मात्र नाटकातील धांडे पाटील कादंबरीतील धांडे पाटलापेक्षा अधिक रागीट स्वभावाचे, आक्रमक वाटतात. नलिनीकडे पैसे मागायला गेल्यावर ते नलिनीला रागात म्हणतात - 'काय म्हणलीस? हिच्या आयला, मरद असता तर तुझा खुरदा केला असता आत्तापातूर !' यातून त्यांच्या स्वभावाचे दर्शन घडते. अशा प्रकारे थोडा बदल करुन हे पात्र नाटकात येते.

*** कुलकर्णी मास्तर :**

कुलकर्णी हे राजापूरचे रिटायर्ड शिक्षक आहेत. सरपंचाप्रमाणेच कुलकर्णी मास्तरपण राजापूरच्या हितासाठी प्रयत्नशील असतात. कादंबरीतील पात्राप्रमाणेच नाटकातही हे पात्र आहे तसेच येते. कादंबरीत ज्यावेळेस नलिनी हातमाग योजनेसाठी घेतलेली रक्कम परत देण्यास नकार देते तेव्हा ते रागाच्या भरात खूप काही बोलतात आणि आक्रोश, मानसिक ताण, अति भावनात्मकता इत्यादींमुळे त्यांना भोवळ येते व ते जमिनीवर कोसळतात. हा प्रसंग नाटकात येत नाही.

कादंबरीतील मास्तर अविवाहित आहेत. ते शिक्षकीपेशातून वेळ मिळाल्यावर तो वेळ ग्रंथवाचन, समाजसेवा यासाठी खर्च करतात. तर नाटकात ते रिटायर्ड आहेत. मात्र दोन्ही साहित्यकृतीतून प्रामाणिक, सहनशील, संयमी असेच कुलकर्णी मास्तर भेटतात.

*** मनोहर जोशी :-**

मनोहर हा अत्यंत गरीब कुटुंबातला पण हुशार असा सुशिक्षित बेकार आहे. घरच्या दारिद्रयाला कंटाळून त्याचे वडील आत्महत्या करतात. वडीलांच्या मृत्यूनंतर घरची सगळी जबाबदारी मनोहरवर येऊन पडते. पण त्याच्याकडे गुणवत्ता असूनही केवळ ओळखी नसल्यामुळे, वशिला नसल्यामुळे त्याला नोकरी मिळत नाही. शेवटी तो दिनेशच्या

सांगण्यावरुन नलिनीकडे नोकरी मागण्यासाठी येतो. पण तेथेही त्याची निराशाच होते. शेवटी घरच्या गरिबीला कंटाळून तोही वडीलांप्रमाणेच आत्महत्त्या करतो. कादंबरीप्रमाणेच नाटकातही आहे तसेच हे पात्र थोड्याफार फरकाने उभे करण्यात आले आहे. त्याच्या शैक्षणिक पात्रतेतच फक्त बदल करण्यात आला आहे.

या पात्रांशिवाय विवाहित असूनही नलिनीच्या प्रेमात पडलेला व दिनेशला त्याच्या प्राचार्यांशी संगनमत करुन नोकरीहून काढून टाकणारा डी.एस.पी. अभयसिंह काळे, भिकोबा ऐवजी भेटणारा रहिमचाचा, वार्ताहार आण्णा ऐवजी भेटणारे वार्ताहर सुभाष, नव्यानेच येणारे अरुण शिंदे व मोहिनी या पात्रांबरोबरच इतरही काही पात्रे कादंबरीप्रमाणेच नाटकातही भेटतात.

कादंबरीचा आवाका मोठा असल्याने कादंबरीत अनेक पात्रे येऊ शकतात. परंतु नाटक हे रंगमंचावर प्रयोग रुपाने सादर होत असल्याने कादंबरीतील असंख्य पात्रे नाटकात येऊ शकत नाहीत. पात्रसंख्येवर प्रयोगशीलतेमुळे मर्यादा पडतात. कथानकाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असणारी पात्रेच निवडून रंगभूमीवर आणावी लागतात. कादंबरीतील अनावश्यक घटना-प्रसंगांना व त्यांच्याशी संबंधीत पात्रांना नाटकात स्थान मिळत नाही.

नाटकाची मर्यादा लक्षात घेऊनच नाटककारास पात्रांची योजना करावी लागते. अगदी मोजक्याच पात्रांच्या सहाय्याने नाट्यविषय प्रभावीपणे व्यक्त करावा लागतो. त्यामुळे 'मुखवटा' कादंबरीचे 'मॅडम' हे रुपांतर करताना श्रीनिवास भणगेंनी कादंबरीतील अनेक पात्रे वगळली आहेत. उदा. कादंबरीतील विद्या देवधर, सुधा तारे, अलकुंठे हा विद्यार्थी, करिमखाँ ड्रायव्हर, प्रा.सौ.वासंती कुलकर्णी, डॉ. युवराज पाटणकर, वकील शेख साहेब, नलिनीची आई इत्यादी पात्रांचा समावेश नाटकात होत नाही. त्यामुळे त्यांच्याशी संबंधीत प्रसंगांनाही नाटकात स्थान नाही.

अशा प्रकारे मोजक्याच घटना-प्रसंगांची आणि पात्रांची निवड करुन त्याच्या सहाय्याने मूळ कादंबरीतील विषय नाट्यरुपांतरात उतरविण्याचा प्रयत्न श्रीनिवास भणगेंनी केला आहे. असे नाट्यरुपांतर करतांना आवश्यक तेथे व्यक्तिचित्रणात बदल केला आहे. या बदलांमुळे थोड्याफार प्रमाणात कथानकात बदल झाल्याचे जाणवते.

### ४.३ कथानकातील बदल :

'मुखवटा' कादंबरीचे नाट्यरुपांतर करत असताना साहित्य प्रकारानुसार

नाट्यरुपांतराच्या कथानकात थोडासा बदल करण्यात आल्याचे जाणवते. लेखकाला आपला अनुभव व्यक्त करण्यासाठी कादंबरी वाङ्मयप्रकारात स्वातंत्र्य असते. कादंबरीचा आवाका नाटकापेक्षा मोठा असतो. त्यामुळे कादंबरीचा जीवनपट विशाल बनू शकते तर नाटकास मर्यादा पडते. नाटकाला वेळेचे बंधन पाळावे लागते. म्हणून कादंबरीतील विशाल अनुभव नाटकात उतरविताना त्याचा आवाका मर्यादित करणे गरजेचे असते. कथानकास कमी महत्त्वाचे ठरणारे लहान-लहान घटना-प्रसंग व पात्रे नाटकात वगळावी लागतात आणि नाटकास अनुरुप असे कथानक बनवून त्यातून तोच विषय मांडावा लागतो. इथेही श्रीनिवास भणगेंनी कथानकात थोडासा बदल केला आहे.

गरीब कुटुंबातील नलिनीचे लग्न एका खाजगी कंपनीतील कारकूनाशी होते. लग्न झाल्यावर ती फार खुष होते. मात्र तिचा हा आनंद फार काळ टिकत नाही. कारण लग्नात ठरलेल्या हुंड्याची रक्कम मिळाली नाही म्हणून तिचा नवरा रोज रात्री तिची वासना जागृत करुन त्याचे शमन न करताच दारु पिऊन झोपी जायचा. असा वेगळ्या प्रकारचा तो तिचा छळ करायचा या छळाचा बदला घेण्यासाठी, सूड उगविण्यासाठी घरातून नलिनी पळून जाते. शहरात जाऊन शिक्षण घेते. आपल्या स्त्रीत्वाचा वापर करुन सर्व काही मिळवते. यानंतर तिच्या पायाशी सर्व सुखं लोळण घेत असतानाच तिचा पती तिच्याकडे आश्रयाला येतो. ती त्याच्यासमोर परक्या पुरुषाशी शृंगारिक चाळे करते, गळ्यात गळा घालून बेडरुममध्ये जाते, आणि त्यातूनच ती बदला घेतल्याचे, सूड उगवल्याचे सुख मिळवते. अशा प्रकारचे कथानक नाटकात येते.

नलिनी ही भाऊसाहेब पाटणकर या प्रांत अधिकाऱ्याची मुलगी आहे. कॉलेजला असताना तिचे समीरवर प्रेम बसते. दोघांच्याही घरच्यांच्या परवानगीने दोघांचा विवाह ठरतो. पत्रिकाही छापल्या जातात. पण ऐनवेळेस समीर नलिनीपेक्षा अधिक सुंदर, श्रीमंत, मोठ्या नोकरीवर असणाऱ्या मुलीशी विवाह करुन परदेशात निघून जातो. त्यामुळे नलिनी खूप रागावते. मग ती फार फार मोठं बनायचं ठरवते. आणि त्या दृष्टीने वाटचाल करु लागते. ती अविवाहित राहते. आपल्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक तरुणास प्रेमाचे खोटे नाटक करुन वेड लावते, शरीरसुख देते. आणि तो पूर्णपणे आपल्या आहारी गेल्याचे जाणवताच त्याला जीवनातून बाजूला करते.

त्यावेळी त्या तरुणाची होणारी तळमळ, तगमग, तडफड पाहून तिला आसूरी आनंद

होतो, तिचे स्त्रित्व सुखावले जाते. आणि तिला समीरचा सूड घेतल्याचे समाधान लाभते. अशाप्रकारे ती कादंबरीत आपल्यावर झालेल्या अन्यायाचा सूड उगवते. अशा प्रकारे कादंबरीच्या कथानकाची मांडणी केली असून कादंबरीत व नाटकाच्या कथानकात थोडाफार बदल केलेला आहे.

दिनेश नलिनीने केलेल्या मदतीला उपकार समजतो आणि तिलाच आपले सर्वस्व मानू लागतो. ईश्वराचे मनापासून आभार मानतो. हा भाग नाटकात येत नाही. तसेच सुधा तारेचे दिनेशवर प्रेम असते. पण ती स्वतः व्यक्त करु शकत नाही. तिला वाटते कुणीतरी स्नेह्याने जाऊन दिनेशला हे सांगावे. हा कथाभाग नाटकात येत नाही. त्याऐवजी मोहिनी व अरुण शिंदेशी संबंधित कथाभाग नाटकात नव्याने येतो. असा बदल कथानकात करण्यात आला आहे.

परंतु कथानकातील या बदलामुळे विषयाला बाधा येत नाही किंवा विषयात बदल होत नाही. दोन्हींतूनही केवळ आपल्यावरील अन्यायाचा सूड घेण्यासाठी पूर्वायुष्यात एक सोज्वळ अशी असणारी नलिनी कशाप्रकारे व्यसनी, निर्दयी, व्यभिचारी बनते आणि तिची ही वागणूक कसे व्यसन बनते. ती आता ईच्छा असूनही यातून बाहेर पडू शकत नाही. हाच विषय नाटकातही मांडल्याचे जाणवते. त्याबरोबर 'हुंडाबळी' या प्रश्नालाही स्पर्श करण्याचा नाटककाराने प्रयत्न केला आहे.

### ०४.४ वातावरणनिर्मितीत झालेला बदल :

कोणत्याही साहित्यकृतीमध्ये वातावरणनिर्मितीस अनन्यसाधारण महत्त्व असते. योग्य आणि परिणामकारक असे वातावरण निर्माण करुन प्रसंगातील, घटनेतील परिणामकारकपणा वाढविण्याची जबाबदारी अनेक घटक पार पाडत असतात. नाटक या वाङ्मयप्रकारामध्ये नेपथ्य, नाट्यसूचना, ध्वनीयोजना, प्रकाश योजना, भाषाशैली, संवाद इत्यादी अनेक घटक वातावरण निर्माण करण्यास सहकार्य करतात.

कादंबरीत बहुतांशी निवेदनातूनच वातावरण निर्माण केले जाते. कादंबरीत अनेकवेळा निवेदनाने वातावरणनिर्मिती केल्याचे आढळते.

'मुखवटा' या कादंबरीत प्रा. जाधव यांनी निवेदनातून वातावरणनिर्मिती केली आहे. तर 'मॅडम' या नाटकात भणगे यांनी संवाद, नाट्यसूचना, नेपथ्य इ. घटकांच्या मदतीने

वातावरणनिर्मिती केली आहे. एकच विषय दोन वेगवेगळ्या साहित्य प्रकारातून आणि दोन भिन्न भिन्न लेखकांनी हाताळला असल्यामुळे नाटकाच्या व कादंबरीच्या वातावरणनिर्मितीत बदल घडून आला आहे. भिन्न भिन्न साहित्यप्रकारांनुसार असा बदल होणे साहजिकच असते.

'मॅडम' या नाटकातील प्रसंग वातावरणनिर्मितीस पुरक आणि पोषक ठरतात. तर काही प्रसंगांना वातावरणास अनुकुल ठरविण्याचे कार्य त्या नाटकातील संवाद करतात.

उदा.

धांडे : अन् बंडल मारायच काम न्हाई... सांगून ठिवतोय!... भाईर उभं हायत त्यांच्यातला येक जरी चवताळला तरी या बंगल्याची मसणवट होऊन जाईल, सांगतो !

नलिनी : (चवताळून) कीप युवर ब्लडी माऊथ शट !

दिनेश : मॅडम, प्लीज ! सांगितलेलं लक्षात आहे ना?

धांडे : (कुलकर्णीस) काय म्हन्ली ती बाई?

कुलकर्णी : 'जरा शांततेनं घ्या' असं म्हणाल्या ! बरं, ते जाऊ द्या...बाई, आम्हाला उत्तर हवंय...आत्ताच्या आत्ता (पृष्ठ क्र.५७)

या पात्रांच्या संवादातून पात्रांच्या मनातील राग, संताप, चीड व्यक्त होते व त्यातून मॅडमच्या बंगल्यात संतापाचे वातावरण निर्माण होते. त्याबरोबर पात्रांच्या मनातील दुसऱ्या पात्राबद्दलचा राग, द्वेष व्यक्त होण्यास मदत होते. अशा तणावपूर्ण वातावरणाबरोबच काही संवादातून आनंदी वातावरणही निर्माण होते. उदा. पृष्ठ क्र. ३७ वरील नलिनी व दिनेश मधील ट्रिपला जाण्याच्या संवादातून आनंदी वातावरण तयार होताना दिसते. त्यातूनच नलिनीच्या रंगेल, रोमँटिक स्वभावाचे दर्शन घडते आणि पात्रांच्या 'मूड' ची कल्पना येते.

श्रीनिवास भणगे यांनी संवादाबरोबरच नाट्यसूचना आणि निवेदने यांचाही वापर वातावरणनिर्मितीसाठी केला आहे. नाटकात स्थल, काल, नेपथ्यरचना, विविध प्रकारचे अभिनय याद्वारेही वातावरणनिर्मिती होत असते. 'मॅडम' नाटकात काही ठिकाणी लेखकाने नाट्यसूचनांच्या माध्यमातून वातवरणनिर्मिती केल्याचे दिसते. उदा.

०१. 'याचवेळी भयंकर ओढवलेला आणि विचारमग्न चेहरा करुन दिनेश येतो. मोहिनीला पाहिल्यावर तर तो खालीच मान घालतो. त्याच्या मनात काहीतरी प्रचंड खळबळ चाललीय.

वेदना होतायत त्याला. तो तसाच येऊन बसतो.' (पृष्ठ क्र. ४९)

०२, 'भयंकर एक्साइट होतो आणि शेवटी धाय मोकलून रडू लागतो. नलिनी त्याला कुशीत घेऊन त्याची समजूत काढते. तोही अन्य कुठलाही मार्ग न दिसणाऱ्या कोकरासारखा... तिच्याजवळ शिरुन रडत राहतो.' (पृष्ठ क्र. ५१)

अशाप्रकारच्या नाट्यसूचनांच्या आधारे लेखकाने पात्रांची मानसिकता, त्या त्या वेळची कृती सांगून गंभीर व शोकाकूल वातावरण निर्माण केले आहे. नाटककार भणगेंनी वातावरण निर्माण करण्यासाठी निवेदन, संवाद, नाट्यसूचना इत्यादी घटकांचा वापर केला आहे. तर कादंबरीत वातावरणनिर्मिती करण्यासाठी फक्त निवेदनाचा, संवादाचा वापर केला आहे.

**०४.५ भाषाशैलीतील साम्य-भेद :**

नाटकात सर्वात अधिक महत्त्व असते ते संवादास आणि त्याचे भाषा हे माध्यम असते. त्यामुळे संवादातून जे कार्य घडत असते तेच कार्य भाषेद्वाराही घडत असते. त्यामुळे नाटकात येणारी भाषा ही भावगर्भ, अलंकारांनी सजलेली, प्रासादिक, म्हणी वाक्प्रचारांनी युक्त, प्रतिमा-प्रतीकांनी सजलेली असावी लागते. इथे 'मुखवटा' कादंबरीतील आणि 'मॅडम' नाटकातील भाषाशैलीत असणारे साम्य-भेद पाहावयाचे आहेत.

'मुखवटा' आणि 'मॅडम' या दोन्ही कलाकृतीत आढळणारी पात्रे ही सुशिक्षित, मध्यमवर्गातील व प्राध्यापक, गुरुजी, कॉलेजचे विद्यार्थी अशी असल्यामुळे दोन्ही कलाकृतीतील पात्रे प्रमाण बोली भाषेचाच वापर करतात. आणि ते साहजिकच आहे. तर दोन्ही लेखकांनी निवदेनासाठी प्रमाण भाषा वापरली आहे.

**१) ग्रामीण बोलीचा वापर :**

ज्याप्रमाणे दोन्ही कलाकृतीतून प्रमाण बोलीभाषा आणि प्रमाणभाषा वापरण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दोन्ही कलाकृतीतून अल्प प्रमाणात ग्रामीण बोलीचा वापर करण्यात आला आहे. प्रामुख्याने कादंबरीतील व नाटकातील सरपंच धांडे पाटील हे पात्र ग्रामीण बोलीभाषेचा वापर करताना दिसते. त्यांचे वास्तव्य हे ग्रामीण भागात असल्याने त्यांच्या तोंडी ग्रामीण बोली येणे योग्य वाटते. उदा.

'खरं हे... खरं हे आपल्या तुकाराम म्हाराजांनी काय म्हनलंय... आदी संसार करावा

नेटका ! मंग तुम्हास्नी काय गानिबिनी लिवायचीत ती लिवा ! बाईचं खरं हे... दोनचं चार हात हुंद्या... घरची शिता सांभाळा आन् मंग कुठं श्यान खायचंय... शिनिमा-नाटकात गानी रचून सावकाशीनं खा. काय मास्तर, खरं का न्हाई?' (पृष्ठ क्र. ११)

अशाप्रकारे नाटकातील सरपंचाच्या तोंडून ग्रामीण भाषा आल्याचे आढळते. तर कादंबरीत सरपंचाच्या बरोबरच नलिनीचा नोकर भिकोबाही ग्रामीण भाषेचाच वापर करतो. नाटकातील सरपंचाच्या तोंडी अधिक जहाल भाषा आली आहे.

**२) हिंदी - इंग्रजी शब्दांचा वापर :**

नाटकात आणि कादंबरीत असणारी बरीचशी पात्रे शिकलेली, शिक्षणक्षेत्रात नोकरी करणारी व चांगल्या पदावर नोकरी करणारी आहेत. त्यामुळे दोन्ही कलाकृतीतील पात्रे बोलताना अधून-मधून हिंदी इंग्रजी भाषेतील शब्द वापरतात. हे शब्द सहजतेने आलेले आहेत. ते दैनंदिन वापरातले आहेत. कादंबरीप्रमाणेच नाटकातही असे हिंदी-इंग्रजी शब्द आले आहे.

उदा. ऑर्डर, ड्युटी (पृ. ७), वनस्ट्रेट (पृ.१७), अपॉइंटमेट (पृ.१८), येस मॅडम ! ब्युटिफूल, हाऊ डेअर यू ! (पृ.२२), बोअर (पृ.२४), कन्फर्म, करेक्ट (पृ. २८), टिपिकल (पृ.४५), प्रॉमिस (पृ.५९), प्लीज (पृ. ६३), शटप (पृ. ६९), गेट आऊट (पृ. ७१) इत्यादी शब्दांबरोबरच काही ठिकाणी इंग्रजी संवादही येतात.

इंग्रजी शब्दांबरोबरच गुस्सा (पृ.१६), अच्छा (पृ.१८), दुवा (पृ.२२), ये तो चलता है (पृ. २६), मारो गोली (पृ. २८), पछतावा (पृ. ३३), शरमिंदा (पृ. ३७), फालूदा (पृ.४०), सलाम (पृ. ६१) अशा अनेक हिंदी शब्दांबरोबरच काही वेळेस हिंदीतून संवादही आले आहेत.

'मॅडम' नाटकातील नलिनीचा नोकर रहिमचाचा कधी अस्सल हिंदी बोलताना आढळतो तर कधी हिंदी-मराठी मिश्रित हिंदी बोलतो. कादंबरीतील वकील शेख साहेब आणि नलिनीचा ड्रायव्हर करिम अस्सल हिंदी भाषेचा वापर करतात. त्याचबरोबर ते मराठी भाषापण बोलतात. अशाप्रकारे दोन्ही साहित्यकृतीतून हिंदी इंग्रजी शब्द आढळतात.

**३) म्हणी-वाक्प्रचार :**

भाषेची परिणामकारकता वाढावी, भाषेचे सौंदर्य खुलावे म्हणून ज्याप्रमाणे कादंबरीत प्रा. टी. के. जाधव यांनी म्हणी-वाक्प्रचारांचा वापर केला आहे, त्याचप्रमाणे श्रीनिवास भणगे

यांनी 'मॅडम' नाटकात वाक्प्रचारांचा वापर केला आहे. वाक्प्रचारातून कमीत कमी शब्दात बराच मोठा आशय व्यक्त करण्याचे कार्य साधले जाते. त्याचबरोबर भाषेची व प्रसंगांची परिणामकारता वाढण्यास मदत होते.

'मॅडम' या नाट्यरुपांतरात - कृतकृत्य होणे (पृ.११), हातातोंडाशी येणे (पृ.१३), जंगजंग पछाडणे, जीव अडकणे (पृ. २१), पोटाला चिमटा घेणे (पृ. ५७), रागाने तिळपापड होणे (पृ. ६४), पाळमुळ खणून काढणे, उपरती होणे, देशोधडीला लावणे (पृ.६७) इत्यादी वाक्प्रचारांचा वापर करण्यात आला आहे. नाट्यरुपांतरास काही मर्यादा पडत असल्याने कादंबरीच्या तुलनेने नाटकात वाक्प्रचारांची संख्या कमी प्रमाणात आहे. तसेच नाटकात म्हणींचे प्रमाण अल्प असल्याचे आढळते तर कादंबरीत मोठ्या प्रमाणात म्हणी येतात.

**४) काव्यात्मकता :**

श्रीनिवास भणगे यांनी संवाद परिणामकारक व्हावेत म्हणून ज्याप्रमाणे इतर भाषेतील शब्द, संवाद, वाक्प्रचार, ग्रामीण बोलीचा वापर इत्यादी घटकांचा वापर केला आहे, त्याचप्रमाणे नाटकात काव्यात्मकेचाही काही प्रमाणात वापर केल्याचे जाणवते. मात्र त्याचे प्रमाण अल्पसे आहे. काव्यात्मकतेमुळे भाषेत एक प्रकारे लयबद्धता निर्माण होते. आणि त्यामुळे भाषेचे सौंदर्य खुलते. काव्यात्मकतेमुळे संवाद वाचनीय/श्रवणीय होतात. अशी काव्यात्मकता नटकात अवतरली आहे.

उदा. ०१) '... आजचा झगमगाटीचा दिवस खरा...

उद्याची शांतता खोटी... आज होणारं शरीराचं

मीलन खरं ... उद्याच्या मनोमीलनाच स्वप्न निखालस खोटं!! (पृष्ठ क्र.६९)

०२) 'गाईच्या दुधावरच्या सायीसारखं मन आणि पहाटकळीसारखं शरीर घेऊन मी उभी होते...' (पृ. क्र. ७०)

०३) 'पूर्वायुष्य खुडून या आयुष्याच मी नव्यानं रोप लावलं होतं. एखाद्या मोठ्या वृक्षासारखं ते फोफावलं आहे.' (पृष्ठ क्र. ७१)

अशा प्रकारच्या इतर अनेक संवादातून नाटकात काव्यात्मकता अवतरलेली आहे. परंतु कादंबरीच्या तुलनेने नाटकात खूपच कमी प्रमाणात काव्यामकता येते. कादंबरीपेक्षा नाटकाचा

आवाका लहान असल्याने आणि मोजक्याच घटना-प्रसंगांना नाटकात स्थान मिळाले असल्याने नाटकात कमी प्रमाणात काव्य येते. दोन्ही कलाकृतींचे लेखक वेगवेगळे असल्याने असे होणे साहजिकच आहे.

याशिवाय 'मुखवटा' कादंबरीत थोड्याफार प्रमाणात शिव्या, अश्लीलता येताना दिसते. मात्र 'मॅडम' नाटकामध्ये अशी अश्लीलता, शिव्या आलेली नाही. अश्लील अशा संवादांना नाटकात स्थान नाही. नलिनीचे अधिकच भ्रष्ट, व्यभिचारी, निर्दयी रुप दाखविण्यासाठी लेखकाने कादंबरीत अश्लीलतेचा वापर केला असावा. अशा प्रकारचे भाषाशैलीत काही साम्ये, काही भेद आढळून येतात. दोन्ही कलाकृतींचे लेखक व वाङ्मयप्रकार भिन्न-भिन्न असल्याने असे साम्ये-भेद निर्माण होणे साहजिकच आहे. एवढे असूनही दोन्ही साहित्यकृतींच्या भाषाशैलीत म्हणावा एवढा फारसा भेद जाणवत नाही.

**०५. मॅडम नाटकातील संवाद :-**

नाटकातील कथावस्तू ही संवादाच्या माध्यमातून प्रगत आणि प्रकट होताना दिसते. कथा कांदबरी या साहित्यप्रकाराच्या रचनेत संवाद हे एक रचनेचाच एक भाग म्हणून अवतरतात. परंतु नाट्यवाङ्मयात ते रचनेचा एक भाग म्हणून येत नसून सर्व नाटकच संवादमय असते. नाटकात संवादास अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. नाटकातील अनेक घटक (वातावरण, व्यक्तिरेखाटण, संघर्ष, रसाविष्कार... इ.) हे संवादातूनच व्यक्त होत असतात.

नाटकातील संवाद म्हणजे सत्याभास निर्माण करणारे जीवनदृश्य संभाषण होय. संवादाशिवाय नाटक निर्माणच होणार नाही. या संवादाबद्दल ब्रह्मे लिहतात - ''त्यात रोजच्या व्यवहारातील संभाषणापेक्षाही काही निराळे असते की, जी प्रेक्षकांना जाणवते व प्रेक्षक सुखावतात. प्रेक्षकांच्या कानावर चांगले खुसखुशीत गतिमान व लाह्या फुटाव्यात तसे संवाद पडल्यावर, त्यांना एक आगळाच आनंद जाणवतो.''[६] 'मॅडम' या नाटकातही असे संवाद येतात. अशा संवादातूनच श्रीनिवास भणगे पात्रांच्या स्वभावाचे दर्शन घडवून त्यांची स्वभाववैशिष्ट्ये सांगतात.

उदा. 'धांडे : येळ जाण्याबद्दल काय न्हाय हो, मास्तर. त्यो फुकट जाऊ न्हायी. वाळूत मुतलं-फेस ना पानी असं व्हायला नगं ! पर असली जंक्शन बाई हायतरी कोण म्हणायची?'

कुलकर्णी : आहो बाई म्हणजे जिल्ह्याचं भूषण ! ह्या शहराच्या महापौर आणि थोर सामाजिक कार्यकर्त्या नलिनीबाई पाटणकर म्हणजे अशातशा आसामी नव्हेत धांडे सरकार ! अहो, त्यांचा नुसता शब्द तोंडातून पडला की थेट दिल्लीत कामं व्हायला लागलीत आता.' (पृष्ठ क्र. ०६)

या संवादातून नलिनी या पात्राचा परिचय होतो. तसेच तिचे समाजात असणारे स्थान, तिची वरपर्यंत असणारी पोहोच, तिच्या शब्दाला मिळणारा मान या सर्वांची ओळख होते. अशाच संवादातून दिनेशची ओळख लेखकाने करुन दिली आहे (पृष्ठ क्र. १०-११).

संवाद हेच घटना प्रसंगाचे स्थायी घटक असल्याने संवादामार्फतच विशिष्ट प्रसंग अथवा घटना उजळून दाखविली जाते. यासंदर्भात नाटकातील नलिनी व अभियसिंह काळे यांचा संवाद उल्लेखनीय आहे.

काळे : नवा मित्र सापडलेला दिसतोय !

नलिनी : हं ! आता कसा मुद्यावर आलास?

काळे : कोण... ते कवडं? प्राध्यापक... दिनेश सारवळकर ?

नलिनी : दॅट इज नन ऑफ युवर बिझनेस ! लेट अस से 'गुडबाय' अँड पार्ट !

काळे : मी त्याला असा गोत्यात आणीन की ...

नलिनी : थांब, थांब अभय, हा जरा जास्त अगाऊपणा होतोय, असं तुला नाही वाटत? मित्रा, या बाईला नलिनी पाटणकर म्हणतात... तू दिनेशचा भांग मोडलास तर मी तुझं मुंडकं उडविण, त्याबद्दल निदान तुला तरी शंका नको. (पृष्ठ क्र. ३५)

या नलिनीच्या व अभयसिंहच्या संवादातून दोन पात्रांमधील संघर्ष अधिक परिणामकारकपणे साकार होतो. त्याचबरोबर नलिनीच्या स्वभावातील निर्भिडवृत्ती, करारीपणाचे दर्शन होते. त्याने संघर्षातील उठावदारपणा दिसतो. तसेच पात्रांच्या मनातील संघर्ष, दुसऱ्या पात्राबद्दलचा राग, द्वेष, मत्सर, चीड व्यक्त होऊन पात्रांपात्रांमधील संबंध, त्यांच्या एकमेकाबद्दलच्या भावना, विचार व्यक्त होतात.

याशिवाय ज्या गोष्टी रंगमंचावर दाखविणे शक्य नसते. अशा गोष्टींचा उल्लेख अथवा वर्णन संवादातून येते. घटना-प्रसंगाबरोबरच व्यक्तींचे मनोभाव उलगडून दाखविण्याची

जबाबदारी संवादावरच येऊन पडते. असे काही संवाद 'मॅडम' नाटकात आल्याचे दिसून येते. अशा रीतीने व्यक्तिरेखा साकार करणे, कथानकास गती देणे, प्रसंग उठावदार करणे इत्यादी मुख्य हेतू संवादाचे आहेत. अशा संवांदाशिवाय मॅडम या नाटकात पात्रांच्या मनातील, वातावरणातील ताण-तणाव, संघर्ष व्यक्त करणारे काही संवाद येतात.

## ०६. कादंबरीचे यश आणि नाटकाचे यश :-

श्रीनिवास भणगे यांनी 'मुखवटा' कादंबरीचे 'मॅडम' या नावाने नाट्यरुपांतर करुन कादंबरीतील आशय, विषय तेवढ्याच परिणामकारकपणे रंगभूमीवर आणाला. कादंबरी आणि नाटक हे दोन्ही वाङ्मयप्रकार वेगवेगळे असले आणि ते वेगवेगळ्या दोन लेखकांनी हाताळले असले तरीही दोन्ही कलाकृतीतून एकच एक विषय मांडण्यात आला आहे. 'मुखवटा' कादंबरीतून मांडण्यात आलेला विषय 'मॅडम' या नाटकातून यशस्वीपणे मांडण्यात भणगे यशस्वी झाले आहेत.

कादंबरीतील अनुभवाचा विशालपट नाट्यरुपांतरातून मांडत असताना नाटककारास अनेक मर्यादा पडतात. कादंबरीपेक्षा नाटकाचा आवाका लहान असतो, दोन्ही वाङ्मयप्रकारांचा फॉर्म वेगळा असतो. नाटकाला वेळेचे बंधन असते इत्यादी कारणामुळे नाट्यरुपांतर करताना कादंबरीतील अनेक घटना प्रसंगांची, पात्रांची काटछाट करुन कादंबरीतील विषय तेवढ्याच तीव्रतेने नाट्यरुपांतरातून व्यक्त व्हावा लागतो. आणि असे करत असताना कथानकाची वीण, त्यावरची पकड कोठेही सैल पडून चालत नाही. आणि हे सर्व श्रीनिवास भणगे यांनी लिलयेने साधले आहे.

'मुखवटा' कादंबरीतील निवडक असे घटना-प्रसंग घेऊन भणगेंनी नलिनीच्या व्यक्तिचित्रणात आणि कादंबरीतील विषय नाटकातून मांडण्यात कोठेही कमतरता येऊ दिलेली नाही. कादंबरीतून व्यक्त होणारीच नलिनी नाटकातूनही व्यक्त होते. कथानकातील मोजकेच घटना-प्रसंग नाट्यरुपांतरात जोडून घेण्यात सहजता आणि स्वाभाविकता असल्याने नाट्यरुपांतरातील लेखकाचे कौशल्य नजरेस पडते.

नलिनीने आपल्या नवऱ्याचा 'पाळीव' प्राण्याप्रमाणे सांभाळ करणे, सरपंच धांडे पाटील पैसे मागण्यासाठी आल्यावर संतापणे, रागावणे, अरुण शिंदेला नलिनीच्या घरी पाहून मोहिनीने चिडणे इत्यादी प्रसंग नाटकात उत्कृष्टपणे गुंफल्याने ते अधिक प्रभावी वाटतात व नाटक एक

विशिष्ट प्रकारची उंची गाठते. त्याचबरोबर नलिनीचा व्यभिचार दाखविण्यासाठी कादंबरीत तिचे अनेक पुरुषांशी संबंध असल्याचे दाखविले आहे. पण नाटकात मोजकेच प्रसंग घेऊन मॅडमचा व्यभिचार दाखविला आहे. कादंबरीत आलेल्या या प्रसंगांची गर्दी झाल्यासारखे वाटते. ते प्रसंग अनावश्यवक वाटतात. उलट ते प्रसंग नाटकात गाळल्याने नलिनीच्या व्यक्तिचित्रणात कोणताही उणेपणा जाणवत नाही. हे नाटकाचे वैशिष्ट्य म्हणता येईल.

'मॅडम' या नाट्यरुपांतराद्वारे कादंबरीतील विषय असंख्य प्रेक्षकांपर्यंत जाऊन पोहोचला नाटक हे दृकश्राव्य अशा दुहेरी स्वरुपाचे असल्याने मुखवटा कादंबरीपेक्षा नाटक अधिक यशस्वी ठरले. नाटकास अधिक लोकप्रियता, प्रसिद्धी मिळाली.

नाटक हे रंगभूमीवर अभिनयाच्या स्वरुपात सादर होत असल्याने नाटकातील व्यक्तिरेखा, प्रसंग, अनुभव प्रत्यक्ष डोळ्यांनी जिवंत स्वरुपात अनुभवता येतो. तसेच प्रकाशयोजना, ध्वनिसंयोजन, रंगमच, नेपथ्य, दिग्दर्शन, अभिनय या सर्व घटकांमुळे नाटकाची परिणामकारकता वाढते व नाटक यशस्वी होते. 'मॅडम' या नाटकाचे दिग्दर्शन व नेपथ्य भालचंद्र पानसे यांनी अतिशय उत्कृष्टपणे करुन नाटकाच्या यशस्वीतेत हातभार लावला आहे.

तर नाटकातील नलिनीची भूमिका त्यावेळची प्रसिद्ध अभिनेत्री आशूने केली होती. तर इरसाल धांडे पाटलांच्या भूमिकेत रमेश पवार भेटतात. प्रा. प्रविण देवस्थळी (दिनेश), अशोक कुलकर्णी (कुलकर्णी मास्तर), सुधीर देशमुख (अशोक) अशा कालाकारांच्या उत्कृष्ट अभिनयाने नाटक यशस्वी बनले. या कालाकाराने ती ती पात्रे आपल्या अभिनयाने जिवंत करुन प्रेक्षकांच्या मनावर ठसा उमटविला.

उत्कृष्ट दिग्दर्शन, नेपथ्य, दर्जेदार अभिनय, नाट्यतंत्राचा योग्य वापर, प्रकाशयोजना, ध्वनिसंयोजन यासर्व घटकांबरोबरच उत्कृष्ट घटनाप्रसंगांची निवड या सर्व घटकांच्या योग्य संगमाने 'मॅडम' नाटक यशस्वी झाले. नाट्यरुपांतरात नाटककाराने वापरलेल्या कौशल्यामुळे नाटक कोठेही विस्कळीत किंवा कथानकाचा धागा सुटल्यासारखे वाटत नाही. त्यामुळे नाटक परिपूर्ण वाटते व कादंबरीपेक्षा सरस ठरते, यशस्वी ठरते.

**०७. समारोप :-**

वरीलप्रमाणे काहीसा बदल करुन श्रीनिवास भणगे यांनी 'मॅडम' हे नाट्यरुपांतर केले आहे. असे नाट्यरुप देत असताना नाटकाचे तंत्र हे वेगळे असल्याने काही बदल करणे

अपरिहार्य होते. आणि तसे बदल नाटककाराने करुन कादंबरीतील विषय नाटकातून हूबेहूब मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आणि त्यात लेखक यशस्वी झाला आहे. नाटकाचा व कादंबरीचा अभ्यास करत असताना दोन्ही साहित्यकृतींतून काही भेद नजरेस पडत असले तरी त्या भेदांपेक्षा साम्यच अधिक आढळतात. कादंबरीत आणि नाटकात अनेक प्रसंग आहेत तसेच आहेत. पात्रे आणि पात्रांची नावेही तीच ठेवण्यात आली आहेत.

एकच विषय दोन भिन्न-भिन्न वाङ्मयप्रकारातून मांडल्याचे इथे पहावयास मिळते. कादंबरीतील विषय नाटकातून मांडण्यात भणगे यशस्वी झाले आहेत. नाटक हा वाङ्मयप्रकार दृकश्राव्य असल्याने कादंबरीचा आशय विषय अधिक प्रभावीपणे नाटकातून व्यक्त झाला. अभिनेत्री आशू व इतर कलाकरांच्या अभिनयाने व नाट्यतंत्राने प्रेक्षकांच्या मनावर ठसा उमटविला. परिणामी कादंबरीपेक्षा नाटक अधिक यशस्वी ठरले नाटकास अधिक यश मिळाले.

# * संदर्भ ग्रंथ *


०१. भणगे, श्रीनिवास : मॅडम
संजय प्रकाशन, पुणे - ४,
आवृत्ती पहिली,
१ मार्च १९८२,
पृष्ठ क्र. ४१.

०२. तत्रैव : पृष्ठ क्र. ६९.

०३. तत्रैव : पृष्ठ क्र. ६१.

०४. जाधव, टी. के. : मुरववटा
धारा प्रकाशन, औरंगाबाद,
आवृत्ती पहिली, १९८१,
पृष्ठ क्र. ४७.

०५. भणगे, श्रीनिवास : मॅडम
संजय प्रकाशन, पुणे - ४,
आवृत्ती पहिली,
१ मार्च १९८२,
पृष्ठ क्र. १९.

०६. जोशी, अ. म. (संपा.) : नाट्यकला - प्रवेश
व्हीनस प्रकाशन, पुणे,
आवृत्ती पहिली, १९५४,
पृष्ठ क्र. १७८.